**NANDED WAGHALA CITY MUNICIPAL CORPORATION, NANDED**

(शासन निर्णय दि.12.04.2017 व दि.29.06.2017 नुसार) **Tender Notic 2024-25**

**Tender Notice No. :- NWCMC/PWD/ E-Tender / १४२२६ /२०२५ Date 21.02.2025**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे खाली दर्शविण्यात आलेल्या कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन B-1 नमुन्यात निविदा मागवित आहेत. या निविदा फक्त वेबसाईट https://mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील निविदा फक्त इंटरनेटवरुन खरेदी करता येतील व इंटरनेटवरुन भरता येतील. सर्व कंत्राटदाराना Digital Signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | 23.02.2025 | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | 24.02.2025 | 15.00 |
| 3 | ई-निविदा भरणे | 24.02.2025 | 15.00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अतिम दिनांक व वेळ | 03.03.2025 | 15.00 |
| 5 | ई-निविदा उघडणे | 06.03.2025 | 15.00 |

| टेंडर क्र. | विभागाचा क्रं. | कामाचे नांव | अंदाजपकीय किंमत रक्कम रु. | इसा-याची रक्कम रु. 0.50 % | सुरक्षा अनामत रक्कम रु. 1% | को-यानिविदेची किंमतविक्रीक य सहीत = 28% (GST) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 01.01.2024 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत बिलालनगर चौक रस्ता ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौफाळा पर्यंत सी.सी रस्ता व सी.सी नाली करणे. | 25385960/- | 127000/- | 254000/- | 2560/- | **06 महिणे** |

<u>अटी व शर्ती</u>

<u>A) निविदाधारकांनी निविदेसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत छायाप्रती तांत्रिक लिफाफ्यात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.</u>

१) निविदाधारकांनी इसारा रक्कम (EMD) आणि निविदा शुल्क (Tender Fee) भरणा केलेली कागदपत्रे स्कॅन/छायांकित प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.

२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापणा अधिनियम २०१८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

४) वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

५) EPF व ESIC नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३ या तीन वर्षाचा आयकर (Income Tax) चा भरणा केल्याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र. सीएटी-२०२२/ प्र.क्र./ इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये निविदाधारकांनी निविदेसाठी कामाचे नाव टाकून निविदेसोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे मुद्रांकवरचे प्रतिज्ञापत्र १००/- रुपयाच्या मुळ स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र टाकून जोडणे बंधनकारक आहे.

८)महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (फ) नुसार महापालिका पदाधिकारी यांचेशी निविदा संदर्भात प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे लेटर हेडवर स्वयंघोषणपत्र सादर करणे बंधन कारक राहील.

९) सिमेंट कॉक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे असल्यास मशिनरीच्या कागदपत्राचा पुरावा दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. सिमेंट कॉक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे नसल्यास त्याबाबतचा वैध भाडे करारनामा सादर करणे आवश्यक आहे.

१०) विद्युत कामासाठी कंत्राटदाराने विद्युत कंत्राटदाराशी करारनामा करुन, करारनामा व विद्युत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे

११) सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या पाच वर्षातील कंत्राटदाराची कमाल वार्षिक ऊलाढाल प्रत्येक कामाच्या ७०% असणे आवश्यक आहे.

१२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र. ४७/इमारती-२ दि.२५.१०.२०१९ अन्वये निविदाधारकांनी सन- २०१९-२०, २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या पाच वर्षात तुल्यबळ किंमतीचे किमान १ व त्याच स्वरुपाचे काम पुर्ण केले असले पाहिजे, त्याची कमीत कमी किंमत शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार असणे आवश्यक आहे.

१३) निविदाधारकांनी सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या पाच वर्षापैकी कोणत्याही ०१ वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाचे आहे, त्याचे कमीत कमी परिमाण महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र. ४७/इमारती-२ दि.२५ ऑक्टो.२०१९ अन्वये असणे आवश्यक प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकातील जास्त परिमाण असणा-या पाच बाबींचे परिमाण स्वतंत्र प्रपत्रात नमुद करण्यात यावे.

१४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/ इमा.२ दि.११.०५.२०२२ व दि.१२.०५.२०२२ अन्वये नुसार ५०.०० लक्षा पेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदा मध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याबाबत नमुद कले आहे. तथापी एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्ती लागू राहील. करीत चालु वित्तीय वर्षात हाती घेतलेले सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

बिड कॅपॅसिटी= (अXएन X२-बी)

अ- गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्तीत जास्त वार्षीक उलाढाल चालु दराने

एन- देय कामाचा कालावधी (वर्ष)

बी- हातातील कामाची किंमत (देय कामाच्या कालावधीतील)

Bid Capacity काढण्यासाठी या निविदे सुचने सोबत दिलेल्या प्रपत्रात माहिती देणे आवश्यक असुन सदर माहिती उप अभियंता या पेक्षा कमी नसणा-या दर्जाच्या अधिकारी यांनी प्रमाणीत केलेली Bid Capacity प्रत.)

## B) निविदाधारकांनी निविदेसोबत वाणिज्यि क लिफाफा केवळ ब-१ नमुन्यात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.

## C) इतर अटी व शर्ती

**१) निविदाधारकांनी ई-निविदा पोर्टलवर "बिड लॉक" झाल्यानंतर निविदेची "हार्ड कॉपी" ची १ प्रत दि. रोजी दुपारी १५.०० पर्यत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष क्रमांक १०६, तळमजला, महानगपालिका भवन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडो सादर करणे बंधनकारक आहे.**

२) तांत्रिक लिफाफा मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यासनिविदाधारक/ कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील.

३)सदर कामाच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम निविदाधारक यांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य आहे.

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी २०१७/ प्र.क्र.८/इमा- २ दि.२७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०१८ नुसार लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने "Additional Performance Secutity Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कडे जमा करावे.

उदा:- देकार १९ % पेक्षी कमी दराचा असल्यास

१० % कमी दरापर्यत १ % व

१५ % कमी दरापर्यत (१५ % -१०% = ५%)

तसेच (१९-१५) = ४ % करीता (४x२=) ८ % असे एकुण (१+५+८) = १४ %)

५) निविदाधारक यांनी इसारा रक्कम E- Tender या संकेतस्थळाच्या Online Payment Gatewayव्दारे भरणा करावी.

६) निविदाधारक यांनी त्यांचेकडील कंत्राटी कामगार/मजुर यांचा EPF व ESIC चा भरणा वेळेच्या आत करणे आवश्यक आहे. तसेच तसेच त्यांना मिळालेल्या कामामधुन EPF व ESIC कामगारांचे नांवासहीत यादीसह चालान भरणा करणे आवश्यक आहे. याबाबतची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.१५१/ इमारती-२ दि. १४.०१.२०१९ अन्वये दोष दुरुस्तीचा कालावधी (Defect liability Period) राहील.

८) निविदा धारकास या महानगरपालिकेने कोणत्याही कारणास्तव निविदा भरण्यास प्रतिबंध केलेला नसावा अथवा काळया यादीत टाकलेले नसावे असल्यास अशा निविदा धारकांची निविदा स्विकारण्यात येणार नाही.

९) सदर कामा बाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास न्यायीक प्रकरण मा.जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड पूरते मर्यादित राहील.

१०) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड,करिता

प्रतिलीपी :-
१)नोटीस बोर्ड नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.
२)ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड,करिता